*** वचनांजली ***

भाग - १

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

*** वचनांजली ***

(श्री पेठेकाकांच्या साहित्यातील निवडक संपादित वचने)

भाग : १

साधक परिवार, सातारा

* वचनांजली *

पुस्तकरूपाने प्रकाशित आवृत्ती : नोव्हेंबर, २०१८
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

अशी अडचण नाही की, जिला कुठलाही पर्याय नाही.

खरी लक्षात न येणारी अडचण वेगळीच असते आणि ती म्हणजे, आपल्याला मिळत असलेला पर्याय स्वीकारायची आपली तयारी नसते!

म्हणून अनेकांची जीवनं निराशेत जातात, अडून बसतात !

स्वामींनी न सांगितलेलं कुठलं काम करू नये आणि स्वामींनी सांगितलेलं कुठलं काम केल्याशिवाय राहू नये.

हे ज्याला कळलं आणि ज्यानं आचरलं त्याला स्वामिसेवकाचा खरा संबंध कळला.

अशालाच या संबंधाचा खरा लाभ होतो !

जीवनात अनेक प्रकारची भाग्यं आहेत.

त्यांतही अंतिमतः आपल्या हातात काही नाही, हे लक्षात येण्याचे प्रसंग येणं, हेसुद्धा त्यांतलंच एक महत्त्वाचं भाग्य आहे!

असे प्रसंग कळणं, हे तर महद्भाग्य आहे !

प्रपंचात शिकणं खूप, तेच तेच याअर्थानं आचरण कमी आणि अशांती जास्त आणि अशाश्वत !

परमार्थात मात्र शिकायचं प्रमाण कमी, आचरायचं प्रमाण मात्र खूप आणि समाधान, शांती भरपूर आणि शाश्वत !

आपल्यावर संकटंच संकटं येत असतील, तर गडबडून जायचं काहीच कारण नाही. उलट, तयारीत राहा. भगवंताला आपली मूर्ती घडवायची आहे!

एकदा मूर्ती घडवायला घेतली की मूर्तिकाराचे घाव हेतुपूर्वक, अचूक आणि वेगानंच पडत असतात !

पाच कर्मेंद्रियं, पाच ज्ञानेंद्रियं आणि एक मन अशी अकरा ज्या दिवशी भगवंताकडं वळतील, तो दिवस 'खरी एकादशी' !

आता त्या दिवशी आणि त्यासाठी, काय खावंप्यावं, हे ज्यानंत्यानं ठरवावं !

मनुष्यजीवनाच्या पासिंगसाठी प्रपंच सक्तीचा प्रश्न आहे. पण त्यात फार कष्ट करू नयेत. त्यांचा उपयोग होत नाही, कारण ते गुण धरले जात नाहीत !

परमार्थ ऑप्शनल आहे ! पण त्यात जास्त कष्टांची गरज आहे. कारण त्यावर जीवनाचं पासिंग अवलंबून आहे!

काळजी वाटणं स्वाभाविक आहे, अशी अनेकांची समजूत असते.

पण काळजी कुणी करावी ? ज्यांना नामात काय शक्ती असते, हे माहीत नाही आणि तसं नाम जे घेत नाहीत, त्यांनी !

संत आहेत आणि ते काहीच करीत नाहीत, असं कधीच होणार नाही ! त्यांच्या कार्याचं आपल्याला कदाचित आकलन होणार नाही, हे शक्य आहे !

कारण, संतांच्या नुसत्या अस्तित्वानंसुद्धा असंख्य कार्यं होत असतात...!

शेवटच्या क्षणापर्यंत कार्यरत राहीन असं ठरवणं तितकंसं हिताचं नाही. कारण, कार्याचा हेतू, कृती आणि परिणाम - यांच्या शुद्धीची खात्री नाही !

त्यापेक्षा शेवटच्या क्षणापर्यंत देवाच्या स्मरणात राहीन, असं ठरवावं !

शेवटपर्यंत माणसाचं मागणंही संपत नाही आणि हवेपणही संपत नाही. माणूस काय मागेल, काय हवं म्हणेल, हे सांगता येत नाही !

म्हणून मागायचंच झालं तर सावधानता मागावी, हवं म्हणायचंच तर, नामच हवं म्हणावं !

माणसाला लोकांची एवढी सवय झाली आहे, की काही करायचं की, लोक काय म्हणतील, याचा विचार मनात आधी येतो !

वास्तविक, लोकच काय, सबंध विश्व जो चालवतो तो काय म्हणेल, याचा विचार खरंतर काहीही करण्यापूर्वी मनात आधी यावा !

आपण मुळात कुठून आलो आणि आपल्याला शेवटी कुठं जायचं आहे, हे आयुष्यभरातसुद्धा अनेकांच्या मनात येत नाही. वास्तविक त्यावर आपलं आत्ताचं जीवन कसं जगावं हे ठरतं !

त्यासाठी शेवटी कुठं जायचं आहे, तिथं थोडा वेळ तरी रोज जाऊन येणं म्हणजे 'नित्योपासना' !

माणसं आयुष्यभर असंख्य कामं करीत राहतात. आयुष्य संपलं तरी कामं संपत नाहीत, हे चाललंही असतं.

पण आपली कामं संपत नसल्यामुळं आपल्याला आयुष्य देणाऱ्या भगवंताचं आपल्याकडं काय काम आहे, ते शेवटपर्यंत दुर्दैवानं कळत नाही !

खऱ्या गुरूंकडं आलेला प्रत्येक शिष्य, खऱ्या गुरूंना कायम शिष्यच राहावा, असं कधीच वाटत नाही. तोही खरा गुरू व्हावा असंच त्यांना वाटतं!

ते फक्त खऱ्या शिष्यांनाच समजतं, पटतं. तेही ते पुढं ती परंपरा चालवतात, आनंदानं !

श्रीपेठेकाकांच्या साहित्यातील निवडक वचनांचे संकलन